# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक १७.०४.२०२६ शुक्रवार**

**पोलीस ठाणे तहसिल :— कुख्यात गुन्हेगार ०१ वर्षाकरीता हद्दपार**

पोलीस ठाणे तहसिल हद्दीत राहणारा गुन्हेगार मोहम्मद अजनान उर्फ अन्ना वल्द मोहम्मद नियाज वय २० वर्षे रा. मोमीनपूरा, किद्‌वाई रोड, गरीबनवाज मस्जिद जवळ, तहसिल, नागपूर याचे विरूध्द पोलीस ठाणे तहसिल येथे दुखापत करणे, अश्लिल शिवीगाळ करून मारपीट करणे, शस्त्रासह जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, प्राणघातक शस्त्रानिशी सज्ज होवून गंभीर दुखापत करणे अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत. त्याच्या या कृत्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याने मा. श्री राहुल मदने, पोलीस उपआयुक्त, परि. क्र. ०३ नागपूर शहर यांनी मोहम्मद अजनान उर्फ अन्ना वल्द मोहम्मद नियाज यास कलम ५६ (१)(अ)(ब) मुं.पो.का. १९९१ अन्वये आदेश क्र. ०८/२०२६ दिनांक १६.०२.२०२६ व बजावणी आदेश क्र. पोउपआ/परि.०३/हद्दपार आदेश बजावणी/१४९४/२०२६ दिनांक १६.०४.२०२६ नुसार नागपूर शहर नागपूर व नागपूर ग्रामिण जिल्हा हद्दीतून ०१ वर्षाकरीता हद्दपार केले आहे.

नमुद हद्दपार कारवाई मा. श्री राहुल मदने, पोलीस उपआयुक्त, परि. क्र. ०३ नागपूर शहर, मा. श्रीमती अनिता मोरे सहायक, पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. संजय मेंढे, पोनि. गुन्हे राहुल वाढवे, पोउपनि. रसुल शेख, सफौ. अनिल ठाकुर, पोहवा. प्रदीप सोनटक्के, रामकैलास यादव, विनोद गवई, पोअं. पंकज निकम, राशीद शेख, पंकज बागडे, किशोर धोटे यांनी केली.

**(कामगिरी)**

**नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १६.०४.२०२६ रोजी वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,६६२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,०५,९००/—रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आली असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे कळमना :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.०४.२०२६ चे २०.०० वा. ते दिनांक १६.०४.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, प्लॉट नं. २८४, जयहिंद शाळेच्या मागे, गुलशन नगर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी सुनिल नारायण सायरे वय ५२ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मोठ्या भावाकडे जरीपटका, नागपूर येथे मुक्कामाकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, घरातील सोनी कंपनीचा होम थियेटर, एलसीडी टि.व्ही.,

सोयाबीन तेलाचा डबा, एस. आर. कंपनीचा लॅपटॉप व रोख १,००,०००/— रु. असा एकूण १,२९,८००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. अजय गरजे ८८३०००१७०२ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे बजाजनगर :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

आरोपी क्र १) गणेश बच्चुमल पंजवानी वय ४६ वर्षे रा. पोद्दार गार्डन, रामनगर, वर्धा व २) अनिल राजकुमार वलीच्छा वय ४८ वर्षे रा. साईबाबा रोड, वर्धा यांचे पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत वर्धा रोड, रामदास पेठ, प्लॉट नं. ४२, दिवाण प्लाझा, शॉप नं.०१ येथे इलेक्ट्रीक स्कुटर विकण्याचे दुकान आहे. फिर्यादी भोलेशंकर चेतनदास कस्तुरी, वय ५५ वर्षे, रा. टेलीफोन एक्सचेंज क्वेटा कॉलोनी प्लॉट नं. १७२, नागपूर हे इलेक्ट्रीक स्कुटर घेण्याकरीता आरोपीतांचे वरील दुकानात गेले असता, आरोपीतांनी विद्यार्थी यांचे नावावर बाईक घेतल्यास ऑफर आहे. त्यामध्ये स्वस्तात स्कुटर मिळेल असे प्रलोभन दिले असता, फिर्यादी व फिर्यादीचे ०९ नातेवाईक तसेच दुसरे ग्राहक असे एकुण २२ ग्राहक यांचेकडून दिनांक १०.०१.२०२५ ते दिनांक १७.०३. २०२५ चे दरम्यान आरोपीतांनी इलेक्ट्रीक बाईक बुकींग करीता एकुण ६,५५,०००/—रू. घेवून कोणतेही स्कुटर न देता पळून गेले. आरोपीतांनी फिर्यादीसह एकुण २२ ग्राहकांची ६,५५,०००/—रू. घेवून फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे पोउपनि. पंकज बावणे ८३९०४५८४०१ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१६, ३१८(४), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे शांतीनगर</u> :—** ईरशाद अली महबुब अली वय ३५ वर्षे, रा. कांजी हाऊस, कचरा गल्ली, तायरभाई सायकलवाले यांचे घराजवळ, शांतीनगर, नागपूर हे दिनांक १३.०४.२०२६ चे १५.०० वा. पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे, अंगात— निळ्या रंगाची टी—शर्ट व काळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी बोलतात. सोबत— विवो कंपनीचा मोबाईल क्र. ९५२९८९०१७८

**<u>२) पोलीस ठाणे सक्करदरा</u>:—** विकास दुर्गादास खडसे, वय ४० वर्षे, रा. नवीन बिडीपेठ, बोथरा दवाखान्याजवळ, सक्करदरा, नागपूर हे दिनांक १३.०४.२०२६ चे १०.०० वा. पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १० इंच, केस— काळे, अंगात— निळ्या रंगाचा शर्ट व क्रिम रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— डाव्या हातावर जुन्या माराचे निशान असून ''VR'' असे इंग्रजीमध्ये गोंदलेले आहे.

**<u>३) पोलीस ठाणे लकडगंज</u>:—** उदय दिपक सुचक, वय ३० वर्षे, रा. प्लॉट नं. ४४५, कापसे चौक, गरोबा मैदान, मोहनकुमार हॉस्पीटल जवळ बगडगंज, लकडगंज, नागपूर हे दिनांक १०.०४.२०२६ चे १५.०० वा. पोलीस ठाणे लकडगंज हद्दीतील राहते घरी उज्जैन येथे जातो असे सांगून गेले व दिनांक १३.०४.२०२६ रोजी

११.०० वा. फोनद्वारे सांगतिले की ''मी उज्जैन वरून आता घरी परत येत आहे'' परंतु अद्याप पावेतो घरी परत आले नाही कुठेतरी निघुन गेले. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– लांबट, बांधा– मध्यम, उंची– ५ फुट ६ इंच, केस– वाढलेले काळे, अंगात– जांभळ्या रंगाची हाफ टी–शर्ट व ग्रे रंगाचा ट्राउझर पॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/गुजराती बोलतात, सोबत– ग्रे रंगाची सुटकेस व काळ्या रंगाची हॅन्ड बॅग तसेच ॲप्पल कंपनीचा मोबाईल क्र. ८०५५५००५५६, ओळख– उजव्या हातावर ''शंकरजीचा फोटो' गोंदलेले आहे.



ईरशाद अली विकास उदय

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३२३४१२ /२००७ | कलम १३४, १७७ मो.वा.का. | गणेश शंकर माटे, रा. शेगाव केशव नगर, ताडी, पो. ठाणे शेगाव, जि. बुलढाणा | ०८.०५.२०२६ |
| २. | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०२२३० /२००८ | कलम ८२ सी. आर.पी.सी. प्रमाणे | संजय चन्नुलाल कुती, रा. विजय नगर रेल्वे लाईन जवळ लकडगंज, नागपूर | ०८.०५.२०२६ |

स्वा/–

( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.